'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026 संपर्क : मो. ९०११२०१४१४
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई** Email ID : shabdarutu@gmail.com

✻ वर्ष २ रे ✻ अंक २८ वा ✻ रविवार दि. १३ एप्रिल २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✻ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## चाळीसगावच्या मिरची बाजारात भीषण आग

जळगाव - जळगावच्या चाळीसगाव शहरातील मिरची बाजाराला मोठ्या प्रमाणात आग लागली आहे. आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट पसरले आहेत. या बाजाराच्या बाजूलाच पेट्रोलपंप असल्याने एकच धावपळ उडाली. या आगीत बाजाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आगी-चे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# शिवरायांनी संपूर्ण देशाला स्वराज्याचा मंत्र दिला

## शिवबांना महाराष्ट्रापुरते मर्यादित न ठेवता त्यांचे विचार जगभरात पोहचवा- अमित शहा

मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या २ दिवसीय दौऱ्यावर आहेत. ते शुक्रवारी रात्री पुण्यात दाखल झाले. त्यानंतर आज त्यांनी किल्ले रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. तेथून ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सुतारवाडी येथील निवासस्थानी जाऊन स्नेहभोजन करणार आहेत.

दरम्यान, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अमित शहा यांच्या दौऱ्यावर खोचक टीका केली आहे. त्यांनी त्यांचा उल्लेख शिवरायांच्या हातावर तुरी देणाऱ्या लोकांचे सरदार असा उल्लेख केला आहे.

अमित शहा म्हणाले की, ७ वी ते १२ मधील विद्यार्थी एकदा तरी रायगडवर आला पाहिजे, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्य कसे असावे यांचा एक उदाहरण दिले आहे. शिवराय म्हणाले होते की स्वराज्याची लढाई कधी थांबता कामा नये, भारताला जगात चांगले स्थान निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात सुरू आहे. शिवरायांनी जे-जे सांगितले ती कामे करण्यासाठी आमचे डबल इंजिन सरकार काम करणार आहे.

अमित शहा म्हणाले की, स्वातंत्र्याच्या १०० वर्षांनंतर आपला देश जगात प्रथम असणार आहे. शिवरायांना एका राज्यापूरते मर्यादित करु नये. ते संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थानी आहेत. स्वत:ला आलमगीर म्हणाऱ्या व्यक्ती महाराष्ट्रात आला आणि त्याची समाधी इथेच आहे. तो याच राज्यात पराभूत झाला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी अपराजित स्वराज्य निर्माण केले. स्वराज्यांचे स्वप्न शिवरायांनी पूर्ण केले त्यासाठी मी जिजाऊंना नमन करतो. शिवबांनी आदिलशाही, निजामशाही मुघलांना चकनाचूर केले, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे.

### काम पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध- मुख्यमंत्री

अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम गेल्या काही दिवसापासून रखडलेले आहे. हे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून येत्या काळात लवकरच स्मारक कोणत्याही परिस्थितीत झाले पाहिजे यासाठी राज्य सरकार प्रयत्शील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. रायगड येथील कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की... छत्रपती शिवरायांच्या इतिहासाचा आणि संपूर्ण मराठा साम्राज्याच्या इतिहासांचा ज्यांनी गाढा अभ्यास केला.



जगभरातून पुरावे मिळवून इतिहास समजून घेतला. त्या इतिहासाचे वाचन आणि लेखन केले. ते गृहमंत्री म्हणून नव्हे, तर इतिहासाचे संशोधक म्हणून आले आहेत. रघूजी राजे आंग्रे यांनी योग्य सांगितले ज्यावेळी संपूर्ण देशात मोगलाई, कुतूबशाही, आदिलशाही होती. त्यावेळी या देशातले राजे आणि राजवाडे भंग पावत होते. मोडकळीस येत होते. लढून संपत होते. वाटत होते परकीय आक्रमकांचे राज्य संपणार नाही. तेव्हा आई जिजाऊंच्या आशीर्वादाने छत्रपती शिवरायांसारखा सूर्य उगवला. ते नसते तर आपण कोणीच नसतो. त्यांच्यामुळे आपण देश आणि धर्माचे काम करत आहोत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपतींनी अठरापगड जातींच्या लोकांना एकत्र करून त्यांच्यातले तेज जागृत केले. सामान्य मावळ्यांना विरांमध्ये परावर्तीत करून स्वराज्याची स्थापना केला. आमच्या उदयन महाराज यांनी काही मागण्या केल्या आहेत. त्या संदर्भात योग्य कारवाई करायची आहे, ती करणारच आहोत. महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांवर टकमक टोकांवरूनच लोटले पाहिजे. मात्र, लोकशाही असल्याने काही नियम तयार करू. शिवाजी महाराजांचा प्रमाण इतिहास राज्य सरकारकडून तयार करू. अरबी समुद्रातले स्मारक आता सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाकडे पाठवले. हायकोर्टात लढून ते स्मारक मोकळे करून घेऊ.

### ..तर इतिहास बदलला असता- एकनाथ शिंदे


छत्रपती शिवाजी महाराज यांना तसे फार मोठे आयुष्य मिळाले नाही. आणखी २० ते ३० वर्षे महाराज असते तर देशाचा इतिहास बदलला असता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याचे तोरण बांधले नसते तर आजही आपण गुलामगिरीमध्ये खितपत पडलो असतो. शिवरायांमुळेच आपले अस्तित्व आहे हे कुणाला विसरता येणार नाही.

एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवबाच्या बाबतील आपण काय सांगावे त्यांनी ज्या वाघ नखांनी अफजल खानाचा कोथळा काढला ती वाघ नखे आपण ब्रिटनवरुन आणली आहेत. त्यांचे दर्शन घेण्यासाठी रांगा लागल्या आहेत. शिवरायांनी हाती तलवार घेतली पण निष्पाप लोकांच्या रक्ताने ती रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या रणनितीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो.


उदयनराजे भोसले यांच्या अमित शहांकडे ६ मागण्या

उदयनराजे भोसले म्हणाले की, थोर व्यक्तीसमोर नतमस्तक होण्यासाठी जमलो आहोत. शिवरायांनी समता आणि सर्वधर्मसमभावाचा विचार दिला. युगपुरुष शिवरायांनी नेहमी लोकांचा विचार केला. त्यांच्यासाठी आयुष्य वेचले. लोकांचा सहभाग राज्यकारभारात असावा, हे शिवरायांनी केले. लोकशाहीची मूळ पाया शिवाजी महाराजांनी रचला. ज्या शिवरायांनी आयुष्यातला प्रत्येक क्षण लोकांसाठी वेचला. मात्र, त्यांचा अवमान केला जातो. मी देशाच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे काही मागण्या करणार आहे.

**नवी कोरी पुस्तकं**





**तमसो मा...**
: लेखकाचे नाव :
पंकज कुरुलकर
किंमत रु. : ३६०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर




**स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी प्रवृत्ती आणि प्रवाह**
: लेखकाचे नाव :
अविनाश सप्रे
किंमत रु. : ५५२/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# पाकिस्तानमध्ये ५.३ रिश्टर स्केलच्या भूकंप

कराची : पाकिस्तानात आज (दि.१२) भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. शनिवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास पाकिस्तानला ५.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसल्याची माहिती समोर आली आहे. या भूकंपाची खोली १० किमी एवढी होती. तसेच या भूकंपाचे तीव्र धक्के भारतातील जम्मू आणि काश्मीरमध्येही जाणवले आहेत. श्रीनगर, जम्मू, शोपियान आणि काश्मीरसह अनेक भागात या भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. यामध्ये कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झालेले नाही.



पाकिस्तानच्या काही भागात भूकंपाचे तीव्र धक्के बसल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यातील एका व्हिडीओमध्ये एक व्यक्ती एका मुलासह किराणा दुकानात साहित्य खरेदी करत असताना दिसत आहे. पण एवढ्यात भूकंपाचा तीव्र धक्का जाणवल्याने सदर व्यक्ती दुकानातून पळताना दिसत आहे. असं वृत्त पीटीआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.


भूकंपाचे धक्के जाणवताच लोक जीव वाचवण्यासाठी मोकळ्या जागेकडे धावत असल्याचे काही व्हिडीओत दिसत आहे. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याची कोणतीही माहिती अद्याप तरी समोर आलेली नाही. दरम्यान, राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानेही या संदर्भातील माहिती दिली आहे.

या भूकंपाबद्दल माहिती देताना राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने म्हटलं की, शनिवारी (१२ एप्रिल) दुपारी १:५५ वाजता पाकिस्तानमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले, त्याची तीव्रता ५.३ रिश्टर स्केल तीव्रता मोजली गेली आहे. तसेच या भूकंपाचा केंद्रबिंदू पाकिस्तानच्या जमिनीत १० किलोमीटर खोलवर होता.

# दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेत प्रथमच नव्या खासगी विद्यार्थ्यांना संधी

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) जुलै ऑगस्ट २०२५मध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी नव्या खासगी विद्यार्थ्यांनाही संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत फेब्रुवारी मार्चमधील परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेसाठी संधी दिली जात होती. मात्र, आता शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, या दृष्टीने नव्या खासगी विद्यार्थ्यांनाही परीक्षा देण्याची संधी दिली जाणार आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही



माहिती दिली. फॉर्म नंबर १७ भरून खासगी विद्यार्थ्यांना दहावी-बारावीची परीक्षा देता येते. त्यानुसार जुलै-ऑगस्ट २०२५मध्ये होणारी परीक्षा खासगी पद्धतीने देण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन नावनोंदणी करावी लागणार आहे. त्यानुसार १५ एप्रिल ते १५ मे या कालावधीत ऑनलाइन अर्ज, शुल्क भरणे, नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची मुद्रित प्रत, मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात जमा करता येणार आहे. नव्या विद्यार्थ्यांना केवळ नियमित शुल्काद्वारेच दिलेल्या मुदतीत केवळ ऑनलाइन पद्धतीनेच अर्ज करावा लागणार आहे. विलंब, अतिविलंब शुल्काची मुदत असणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.


खासगी विद्यार्थ्यांनी दहावी, बारावीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी परीक्षा द्यायची असलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम, शाखा आणि इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.

# अंजनेरी येथे हनुमानभक्तांवर मधमाशांचा हल्ला; १५ ते २० जण जखमी

नाशिक - हनुमानाचे जन्मस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंजनेरी येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकांवर मधमाशांनी अकस्मात हल्ला केल्याने १५ ते २० भाविक जखमी झाले. हनुमान जयंतीच्या दिवशी पहाटेपासून भाविकांचे जत्थे अंजनेरी डोंगरावरील मंदिरात दर्शनासाठी निघाले होते. डोंगर मार्गावरील पायऱ्यांवर एकाने शंखध्वनी केला. त्या आवाजाने माकडे सैरभैर पळाली आणि आसपासच्या पोळ्यावरील माशा उठल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यालगत अंजनेरी येथे डोंगरावर हनुमानाचे जन्मस्थान मानले जाते. या ठिकाणी मंदिर आहे. डोंगरावर जाण्यासाठी पायऱ्या व दिवाबत्तीची सोय करण्यात आलेली आहे. हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर, आदल्या दिवशीपासून भाविक अंजनेरी येथे येण्यास सुरुवात झाली. शनिवारी भाविकांची मोठी गर्दी उसळली. सध्या नाशिकचा पारा ४१ अंशावर गेलेला आहे.

तळपत्या उन्हात डोंगरावर जाणे दमछाक



करणारे ठरते. त्यामुळे पहाटेपासून भाविक डोंगरावर निघाले होते. सकाळी पायऱ्यांवरील मार्गावर कोणीतरी शंखध्वनी केला आणि माकडे पळू लागली. यावेळी आसपासच्या पोळ्यांना धक्का लागल्याने मथमाशा उठल्या आणि त्यांनी हल्ला चढविला, अशी माहिती अंजनेरी ग्रामपंचायतीचे सदस्य गणेश चव्हाण यांनी दिली. तर कोणीतरी पोळ्यावर दगड मारल्याने मधमाशांचा हल्ला झाल्याची चर्चा भाविकांमध्ये होती.

अकस्मात हल्ल्यामुळे पायरी मार्गावर एकच धावपळ उडाली. पायऱ्या सोडून डोंगरावर इतरत्र आसरा घेणे अनेकांना भीतीदायक वाटले. या हल्ल्यात एक दाम्पत्य गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. जखमी झालेल्या भाविकांना डोंगरावरून खाली आणण्यात आले. यातील चेतन भगत यांची प्रकृती गंभीर होती. त्यांच्या शरिरातून २०० काटे काढण्यात आले. त्यांना अधिक उपचारार्थ जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. तर अभिषेक साठे, बापू दरेकर, चंद्रकांत नेते, सुरेश वाणी (सर्व नाशिक) हे जखमी झाले.

रुग्णवाहिकेद्वारे त्यांना अंजनेरीच्या प्राथमिक केंद्रात आणून उपचार करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी आशिष सोनवणे यांनी दिली. अनेक भाविकांना मथमाश्यांनी डंख मारला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पायथ्याशी वैद्यकीय पथकही तैनात करण्यात आल्याचे सोनवणे यांनी सांगितले. अंजनेरी गावातून डोंगरावरील मंदिरात जाण्यासाठी साधारणत दीड तास लागतो. अर्धा ते पाऊण तासानंतर स्थिती पूर्ववत झाली. दर्शनासाठी भाविकांची डोंगरावर ये-जा सुरळीत असल्याचे गणेश चव्हाण यांनी सांगितले.

# रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने लाँच केलं व्हॉट्सअॅप चॅनल!

नवी दिल्ली : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने त्यांचे अधिकृत व्हॉट्सअॅप चॅनल सुरू केले असून याच्या माध्यमातून देशभरातली नागरिकांना आर्थिक क्षेत्रातील माहिती सोप्या पद्धतीने उपलब्ध होणार आहे. दुर्गम भागांमध्ये किंवा कमी संपर्क असलेल्या भागांमध्ये राहाणाऱ्या वाररकर्त्यांना मदत व्हावी तसेच त्यांच्यापर्यंत बँकिंग आणि आर्थिक बदलांसंबंधीची माहिती वेळेत आणि सहज व सोप्या पद्धतीने पोहचावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँकेंकडून सर्वसामान्य लोकांमध्ये जागरुकता पसरवण्यासाठी आरबीआय कहता है' नावाची मोहिम सुरू केली आहे. हे व्हॉट्सअॅप चॅनल त्याचाच एक भाग आहे. या मोहिमेअंतर्गत आधीपासूनच एसएमस, टीव्हीवरील जाहिराती, वृत्तपत्रे आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून माहिती पोहचवली जात आहे. ज्यामध्ये व्हॉट्सअॅप चॅनलचा देखील समावेश झाला आहे. याच्या मध्यामातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा आरबीआयचा प्रयत्न आहे.

रिझर्व्ह बँकेने व्हॉट्सअॅप चॅनल सुरू करण्यामागील कारण स्पष्ट केला आहे. व्हॉट्सअॅप चॅनेलचे उद्दिष्ट हे बँकिंग, डिजिटल सुरक्षितता आणि इतर महत्त्वाच्या विषयांबद्दल थेट वापरकर्त्यांना खात्रीलायक आणि वेळेवर माहिती देणे हा आहे. सोशल मीडियावर अनेकदा खोच्या बातम्या परसत असतात त्यामुळे याचा फायदाहोईल. व्हॉट्सअॅप चॅनेलच्या मदतीने थेट आणि सोप्या पद्धतीने अधिकृत माहिती शेअर करून लोकांच्या शंका दूर केल्या जाऊ शकतात, याबरोबरच लोकांमध्ये विश्वास निर्णाण केला जाऊ शकतो असे आरबीआयचे म्हणणे आहे.

# सप्तश्रृंगी गडावर गर्दीमुळे चेंगराचेंगरीसदृश स्थिती

## भाविकांना टप्प्याटप्प्याने सोडण्याचे नियोजन

नाशिक - साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या नाशिक जिल्ह्यातील श्री सप्तश्रृंग गडावर सुरू असलेल्या चैत्रोत्सवात गुरुवारी भाविकांची अलोट गर्दी होऊन गडावरील मुख्य प्रवेशद्वार परिसरात चेंगराचेंगरीसदृश स्थिती निर्माण झाली. गर्दीत लोखंडी जाळ्या मागे-पुढे केल्या गेल्यामुळे मुले आणि महिलांचे हाल झाले.



गडावर भूमिगत गटारी, शेड उभारणी आणि तत्सम विकास कामे प्रगतीपथावर आहेत. यातील काही कामे झाल्यानंतर तेथील जागा एकसमान केली गेली नाही. परिणामी त्याचाही अडसर ठरल्याचे सांगितले जाते. मुळात प्रशासनाने यात्रेपूर्वी संबंधित ठिकाणी समतल करण्याचे सूचित केले होते. गडावर कुठेही चेंगराचेंगरी झाली नसल्याचे प्रशासन आणि देवस्थानचे म्हणणे आहे. गडावर कुठेही चेंगराचेंगरी झालेली नाही, पालखीबरोबर पायी येणाऱ्या भाविकांवर नियंत्रण ठेवणे शक्य नसते. लोखंडी जाळीच्या दोरी निघाल्याने काही काळ गोंधळ झाला. भाविकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.

*- सुदर्शन दहातोंडे* (मुख्य व्यवस्थापक, श्री सप्तश्रृंगी निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तश्रृंग गड)

चुकीच्या पद्धतीने चित्रफित प्रसारित करण्यात आली. त्यात तथ्य नसून परिस्थिती नियंत्रणात आहे. गुरुवारी मोठ्या संख्येने भाविक गडावर दाखल झाले. यात पायी गडावर येणाऱ्यांची संख्या मोठी होती. वाढती गर्दी लक्षात घेऊन पोलिसांच्या मदतीने नांदुरी आणि तलाव या ठिकाणी भाविकांना अर्धा ते पाऊण तास थांबवून ठेवण्याचे नियोजन करण्यात आले. टप्प्याटप्प्याने त्यांना गडावर सोडले जात आहे.

*- रोहिदास वारुळे* (तहसीलदार, कळवण)

दुसरीकडे, गडावर कुठेही चेंगराचेंगरी झाली नसल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी भाविकांना तलाव आणि नांदुरी येथे काही काळ थांबवून ठेवण्याचे नियोजन करण्यात आल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

सप्तश्रृंग गडावर चैत्रोत्सव सुरू असून गुरुवारी दर्शनासाठी अलोट गर्दी झाली. सुमारे एक लाख भाविक गडावर आल्यामुळे नियोजन कोलमडले. दर्शनासाठी १० ते १५ हजार भाविक रांगेत होते. पाटील चौकासमोरील मुख्य प्रवेशद्वार परिसरात गर्दीमुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या ठिकाणी दुतर्फा विक्रेत्यांची दुकाने आहेत. गर्दी नियंत्रणासाठी लोखंडी जाळ्या आणि दोरखंडांचा वापर केला गेला. भाविकांचा ओघ वाढल्याने आपत्कालीन स्थिती निर्माण झाली. कडक उष्मा, गर्दीतून पुढे जाण्याची चढाओढ यामुळे चेंगराचेंगरी होते की काय, असे वाटत होते. या घटनाक्रमाच्या काही चित्रफिती समाजमाध्यमात प्रसारित झाल्यामुळे यंत्रणेची तारांबळ उडाली.

# श्रीरामपुरात उष्माघाताचा बळी ?



श्रीरामपूर : अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या उन्हाचा कहर सुरू आहे. जिल्ह्यात काल ४० अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं. गेल्या आठवडाभरापासून राज्यात उन्हाचा तडाखा पाहायला मिळतो आहे. लोकच नाही तर पशु-पक्षीही गर्मीने हैराण झाले आहेत. अशातच एका ६५ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने बळी गेल्याची चर्चा सुरू आहे. शहरातील वॉर्ड नं. ७ येथील राजकुमार धरमचंद चुडीवाल (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. भगवान महावीर जयंती जन्मकल्याणक शोभा यात्रेत राजकुमार चुडीवाल सकाळी सहभागी झाले होते. शोभा यात्रेत उन्हाचा चटका लागल्यामुळे ते पाणी प्याले असता त्यांना हृदयविकाराचा त्रास जाणवू लागला.

तातडीने संजीवनी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मावळली होती. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून गौतम साबद्रा यांनी नेत्रतज्ञांचे वतीने केले. त्यांच्या पश्चात पती, दोन बधू, दोन मुले, पुतणे असा परिवार आहे. ते महावीर सप्लायर्सचे अनिल चुडीवाल, पुष्पाबाई रसिकलाल बडजाते तसेच किशोर, संजय, अजय चुडीवाल यांचे बंधू तर जयेश, श्रेयश चुडीवाल यांचे ते वडील होत.

### उष्माघात कसा टाळावा ?

* उन्हात विशेषत: दुपारी १२ ते ३ या काळात बाहेर जाणं टाळा.
* तापमान जास्त असताना बाहेर असाल तर थकवणाऱ्या क्रिया वा हालचाली करू नका.
* वेळोवेळी पाणी पीत रहा. तहान लागली नाही तरीही पाणी पित रहा.
* घराबाहेर पडताना हलके, फिकट रंगाचे, सुटसुटीत सुती कपडे घाला.
* डोळे झाकण्यासाठी गॉगल्स, छत्री किंवा टोपी, बूट - चपला वापरा.
* अल्कोहोल, चहा - कॉफी, कार्बोनेटेड ड्रिंक्स या सगळ्यामुळे शरीरातलं पाण्याचं प्रमाण कमी होतं. त्यामुळे ही पेयं टाळा.
* प्रथिनांचं प्रमाण जास्त असलेलं अन्न टाळा आणि शिळं अन्न खाऊ नका
* जर तुम्ही उघड्यावर उन्हात काम करणार असाल तर टोपी - छत्री वापरा, ओला नॅपकिन वापरून डोकं, मान, चेहरा आणि हात-पाय पुसा. पार्क केलेल्या बंद वाहनांमध्ये लहान मुलं - पाळीव प्राण्यांना सोडू नका.
* तुम्हाला चक्कर येत असेल, आजारी वाटत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.
* लस्सी, तोरणी (तांदळाचं पाणी), लिंबू सरबत, ताक अशी घरगुती पेय पिणं फायद्याचं ठरेल. याने शरीरातलं पाण्याचं प्रमाण कायम राहील.
* पंखे, ओला नॅपकीन वापरा. थंड पाण्याने आंघोळ करा.

# कांद्याला चांगला भाव मिळाला की शेतकरी कांदाच लावत सुटतात

## कृषी मंत्री कोकाटे यांचे पुन्हा वादग्रस्त वक्तव्य; रोहित पवारांची टीका

मुंबई : कांद्याला चांगला भाव मिळाला की, शेतकरी कांदाच लावत सुटतात. त्यानंतर कांद्याचे भाव पडतात, असे म्हणत राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर थेट नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे आता कोकाटे पुन्हा एकदा टीकेचे धनी ठरले आहेत. या आधी देखील कोकाटे यांच्या वक्तव्यावरुन त्यांच्यावर निशाणा साधण्यात आला होता. आता पुन्हा एकदा त्यांच्या या वक्तव्यामुळे वाद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



महायुती सरकारमध्ये कृषिमंत्री सारखे महत्त्वाचे खाते अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. मात्र, विद्यमान कृषिमंत्री कायमच त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत राहत आहेत. त्यामुळे विरोधकांच्या हातात आयते कोलीत देण्याचे काम त्यांच्याकडून होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे नुकत्याच झालेल्या पक्षाच्या बैठकीत अजित पवार यांनी कोकाटे यांना चांगलेच खडसावले होते. मात्र, तरी देखील कोकाटे यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुन त्यांनाच दोषी ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी पोस्टमध्ये म्हटले की, 'कांद्याला चांगला भाव मिळाला की शेतकरी कांदाच लावत सुटतात आणि कांद्याचे भाव पडतात हा तर्क आहे महाराष्ट्र राज्याचे महान कृषिमंत्री कोकाटे साहेबांचा! कांद्याचे दर थोडेफार उत्पादन वाढल्याने पडत नाहीत तर केंद्र सरकारच्या निर्यात बंदी, निर्यात शुल्क यासारख्या धोरणांमुळे आणि झोपलेल्या राज्य सरकारमुळे पडतात. त्यामुळे राज्याच्या कृषिमंत्र्यांनी आपले ब्रम्ह ज्ञान शेतकऱ्यांना देण्याऐवजी केंद्र सरकारला दिले तर अधिक बरे होईल. कृषिमंत्री पद हे अत्यंत जबाबदारीचे पद आहे, परंतु विद्यमान कृषि मंत्र्यांना मात्र त्यांची जबाबदारी अजूनही समजलेली दिसत नाही, त्यामुळे नेतृत्वाने कृषिमंत्र्यांची राजकीय काळजी करण्यापेक्षा शेतकऱ्यांची काळजी करावी. अजितदादांनी धाडसी निर्णय घेऊन ज्याला शेतीची समज आहे, संवेदना आहे अशा जबाबदार व्यक्तीकडे कृषिमंत्री पद सोपवायला हवे.

# भिक्षेकरुंच्या मृत्यूप्रकरणी जिल्हा रुग्णालयाची सावध भूमिका

अहिल्यानगर : जिल्हा रुग्णालयात दाखल केलेल्या चार भिक्षेकरुंचा उपचार सुरू असताना झालेल्या मृत्यूनंतर शिर्डीतील भिक्षेकरुंचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यावरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्यानंतर जिल्हा रुग्णालयाने सावध भूमिका घेतली असून शवविच्छेदन अहवालाबाबत गुप्तता बाळगली आहे. नाशिकचे आरोग्य उपसंचालक यांना आज शुक्रवारी शवविच्छेदन अहवाल सादर केला जाणार आहे, तर चौकशी समितीचा अहवाल सोमवारी रुग्णालयास प्राप्त होणार आहे.

शिर्डी पोलीस, नगर परिषद आणि साईसंस्थान यांनी शहरातील भिक्षेकरुंच्या धरपकडीत ४९ जणांना श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर केंद्रात दाखल केले होते. यातील दहा जणांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना ६ एप्रिल रोजी जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. यातील चारजणांचा ७ आणि



८ एप्रिल रोजी मृत्यू झाला होता. यानंतर दोन रुग्णांच्या नातेवाईकांनी भिक्षेकरी नसतानाही विसापूर केंद्रात बळजबरीने दाखल केले, तसेच जिल्हा रुग्णालय व विसापूर येथील भिक्षा स्वीकार केंद्रावर हालगर्जीपणा झाल्याचा आरोप केला होता. नातेवाईकांनी या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

यानंतर बुधवारी खासदार नीलेश लंके यांनी जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या तीन रुग्णांची भेट घेत माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्यावर टीका केली होती. तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या घटनेला राजकीय वळण लागल्याने प्रशासनाने सावध भूमिका घेतली आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात आपला बळी जाऊ नये, यासाठी चारही मृतांच्या शवविच्छेदन अहवालाबाबत जिल्हा रुग्णालाकडून गुप्तता बाळगण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हा रुग्णालयात घडलेल्या प्रकाराची चौकशी व्हावी, दोषींवर कारवाई व्हावी, यासाठी खा. नीलेश लंके यांनी रुग्णालय प्रशासानकडे भिक्षेकरून ठेवण्यात आलेल्या वार्डचे सीसी टीव्ही फुटेजची मागणी केलेली आहे. याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण यांना खा. लंके यांच्यावतीने पत्र देण्यात आले आहे.

# आंबेडकर जयंतीनिमित्त दि.१४ व १५ एप्रिलला टूर सर्कीटचे आयोजन

मुंबई : राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून, त्यांच्या महान कार्याचे आणि जीवनाचे महत्त्व समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे दि.१४ व १५ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचे आयोजन करण्यात येत आहे. टूर सर्कीट अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या स्थळांचा समावेश असून, या सहली नागरिक,पर्यटकांसाठी विनाशुल्क आयोजित करण्यात येत आहेत अशी माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर टूर सर्कीटमध्ये मुंबईतील दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिंटींग प्रेस, परळ येथील बि.आय.टी चाळ, वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट येथील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश आहे. तर नाशिकमधील येवले मुक्तीभूमी, त्रिरश्मी लेणी आणि काळाराम मंदिर या स्थळांचा समावेश आहे. तर नागपूर येथील दिक्षाभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, कामठी येथील ड्रॅगन पॅलेस आणि नागलोक विहार या




स्थळांचा समावेश आहे. सदर टूर सर्कीटच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी जीवनाचा आणि त्यांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि संविधान निर्मितीतील योगदानाचे महत्त्व सर्व सामान्य नागरिक व पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा हा शासनाचा प्रयत्न आहे. सर्व नागरिक/पर्यटकांना या सहलीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पर्यटन संचालनालयाने आयोजित केलेले टूर सर्किट हे सामाजिक समता आणि ज्ञानप्रसाराचे प्रतीक आहे. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य आजही लाखो लोकांना प्रेरणा देतात. या टूर सर्किटद्वारे त्यांच्या जीवनाशी निगडीत स्थळांना भेट देऊन पर्यटकांना त्यांचा समृद्ध वारसा समजण्याची संधी मिळेल. महाराष्ट्रातील चैत्यभूमी, दीक्षाभूमी, मुक्ती भूमी यांसारख्या ठिकाणांचा समावेश या उपक्रमात आहे, ज्यामुळे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल. हा उपक्रम बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीच्या संदेशाला पुढे नेण्यासाठी महत्त्वाचा आहे. पर्यटन विभागाचा हा प्रयत्न स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देईल आणि बाबासाहेबांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवेल. या टूर सर्किटला पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आहे. पर्यटन क्षेत्रातून सामाजिक जागरूकता वाढवण्याचा हा अनोखा प्रयत्न यशस्वी होईल.

प्रधान सचिव अतुल पाटणे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पर्यटन संचालनालयाने आयोजित टूर सर्किट हा एक अभिनव उपक्रम आहे. बाबासाहेबांचे विचार, त्यांचे सामाजिक योगदान आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचे कर्तृत्व यांचा गौरव करणे हा या सर्किटचा उद्देश आहे. या टूर सर्किटद्वारे पर्यटकांना बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडीत महत्त्वाच्या स्थळांचा अनुभव घेता येईल, ज्यामुळे त्यांचा इतिहास आणि तत्त्वज्ञान समजण्यास मदत होईल. चैत्यभूमी, दीक्षाभूमी यांसारखी स्थळे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची प्रेरणास्थाने आहेत. हा उपक्रम पर्यटनाला प्रोत्साहन देतानाच स्थानिक समुदायांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करेल. डॉ. बाबासाहेबांचा समतेचा संदेश सर्वदूर पोहोचवण्यासाठी हा प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरेल. पर्यटन संचालनालयाने यासाठी सखोल नियोजन केले असून, पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

आयोजनाची ठिकाणे : मुंबई, नाशिक आणि नागपूर

कालावधी : दि. १४ व १५ एप्रिल, २०२५

सुविधा: प्रत्येक शहरात दररोज दोन बसेसद्वारे सहल, टूर गाइड, अल्पोपहार, प्रथमोपचार, पिण्याचे पाणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित माहिती पुस्तिकेचे वितरण.

सहलीसाठी संपर्क :
मुंबई ९९६९९७६९६६, नाशिक ९६०७५२७७६३/ ९६५७०२१४५६,
नागपूर ९७६४४८१९१३/ ७२१८७८३५१५

# एक फुटावर सापडला जलजीवनचा घोळ, जलशक्ती मंत्रालयासमोर पितळ उघडे

अहिल्यानगर : प्रतिव्यक्ती ५५ लिटर शुद्धपाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाभरात जलजीवन मिशनअंतर्गत जलवाहिन्यांचे जाळे पसरवण्यात आले. गाडले जाणारे पाइप, किमान एक मीटरपेक्षा खोल अपेक्षित आहे.



केंद्राच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पथकाने तीन दिवस तळ ठोकून कामांची तपासणी केली. त्यात काही ठिकाणी एक फुटांवरच पाइप आढळून आल्याने जलजीवन मिशनचे पितळ उघडे पडले आहे.

खा. निलेश लंके यांनी, जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामाबाबत संसदेत आवाज उठवला होता. या योजनेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करून, अनेक तक्रारी असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले होते.

बैठकीत कानउघडणी जलशक्ती मंत्रालयाच्या केंद्रीय समितीने जिल्हाभर योजनांच्या कामांची पाहणी केल्यानंतर जिल्हा परिषदेत गुरुवारी बैठक घेतली. या बैठकीत आलेल्या अडचणी पाहण्यासाठी आम्हाला यावे लागले, तुमच्या पातळीवर प्रश्न का सुटले नाहीत. कामात पारदर्शीपणा ठेवा ! अशा कडक शब्दात कानउघडणी केल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांकडून समजली.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |


**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**

CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari :
The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform

Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Vision India

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# नितीश कुमार उपपंतप्रधान होणार? राजकीय वर्तुळात चर्चा?

नवी दिल्ली : बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना उपपंतप्रधान करण्यात यावं अशी मागणी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री अश्विनी कुमार चौबे यांनी बुधवारी (तारीख ९ एप्रिल) केली. नितीश कुमार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. राष्ट्रीय स्तरावर त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने त्यांच्याकडे उपपंतप्रधानपदाची जबाबदारी दिल्यास मला आनंद होईल, असंही ते म्हणाले. माजी मंत्र्याच्या या मागणीची सध्या संपूर्ण देशभरात जोरदार चर्चा रंगली आहे. नितीश कुमार यांची खरंच उपपंतप्रधानपदी वर्णी लागणार का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

बिहारमध्ये यावर्षीच्या अखेरीस विधानसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षाचे नेते राज्याचा दौरा करीत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३० मार्चला बिहारचा दौरा केला होता. यावेळी त्यांनी भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांशी चर्चा केली. भाजपाच्या ८४ आमदारांनी पुढील सहा महिन्यांसाठी बूथ व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करावं, असे निर्देश अमित शाहांनी दिले. एकीकडे बिहारच्या मुख्यमंत्रिपदावरून चर्चा होत असताना दुसरीकडे भाजपाच्या ज्येष्ठ नेत्याने नितीश कुमार यांना थेट उपपंतप्रधान करण्याची मागणी केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

नितीश कुमार हे सध्या बिहारचे मुख्यमंत्री आहेत. त्यांचा पक्ष (जनता दल युनायटेड) भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग आहे. केंद्रात आणि राज्यात दोन्हीकडे नितीश कुमार यांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत जनता दल युनायटेडने बिहारमध्ये ११५ जागांवर उमेदवार दिले होते, त्यापैकी केवळ ४३ जागांवरच पक्षाला



विजय मिळवता आला. दुसरीकडे भाजपानं ११० जागा लढवल्या आणि ७५ उमेदवार निवडून आणले. मात्र, पक्षाने युतीधर्म पाळून नितीश कुमार यांच्याकडेच मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली. यंदा मात्र भाजपा मुख्यमंत्रिपदाचे लक्ष्य समोर ठेवूनच रिंगणात उतरेल अशी चिन्हे आहेत. गेल्या ११ वर्षात भाजपानं उत्तर भारतात चांगलं बस्तान बसविलं आहे.

तब्बल २७ वर्षांनंतर दिल्ली विधानसभेची निवडणूक जिंकून पक्षाने राजधानीत स्वत:चा मुख्यमंत्री बसवला आहे. दिल्ली विधानसभेतील विजयानं भाजपाचा आत्मविश्वास आणखीच वाढला आहे. मात्र, असं असलं तरी बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचं भाजपाचं स्वप्न अजूनही अपूर्णच आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाला बिहारचं मुख्यमंत्रिपद मिळाल्यास पक्षाचं उत्तर भारतातील सत्तेचं वर्तुळ पूर्ण होईल, तसंच उत्तर प्रदेश व महाराष्ट्रापाठोपाठ सर्वात मोठं राज्य असलेल्या बिहारचं मुख्यमंत्रिपदही भाजपाकडं येईल. यादरम्यान नितीश कुमार यांची उपपंतप्रधानपदी वर्णी लावून बिहारचे मुख्यमंत्रिपद आपल्याकडे घेण्याची भाजपाची खेळी तर नाहीये ना? असा प्रश्न काही जण विचारत आहेत.

भाजपाचे ज्येष्ठ नेते अश्विनी कुमार चौबे एका कार्यक्रमाला उपस्थिती लावण्यासाठी बुधवारी (तारीख ९ एप्रिल) बक्सरमध्ये आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांबरोबर संवाद साधला. नितीश कुमार यांनी बराच काळ एनडीएमध्ये समन्वयकाची भूमिका बजावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून ते काम करीत आहेत. नितीश कुमार यांच्याकडे उपपंतप्रधानपदाची जबाबदारी दिल्यास ती बिहारसाठी अभिमानाची गोष्ट असेल, कारण जगजीवन राम यांच्यानंतर बिहारला दुसऱ्यांदा हा सन्मान मिळेल. हे माझं वैयक्तिक मत आहे, असं चौबे यांनी म्हटलं. नितीश कुमार यांच्यासाठी कोणतेही पद मोठं राहिलेलं नाही. गेल्या २० वर्षांपासून ते आहेत, ही सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. नितीश कुमार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीममध्ये उपपंतप्रधान म्हणून स्थान मिळवावे, असंही चौबे म्हणाले.

भाजपाच्या ज्येष्ठ नेत्याने केलेल्या या विधानाची सध्या बिहारसह संपूर्ण देशभरात जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांच्या या वक्तव्यावर नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडने प्रतिक्रिया दिली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आधीच स्पष्ट केलंय की, आगामी बिहार विधानसभा निवडणूक नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली लढवली जाईल. राज्यातील जनता मुख्यमंत्र्यांकडे आशेने पाहते आणि भाजपसह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांना याची जाणीव आहे, असं जेडीयूचे प्रवक्ते नीरज कुमार यांनी स्पष्ट केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अलीकडेच सीएनएन- न्यूज १८'च्या एका कार्यक्रमात हजेरी लावली. यावेळी त्यांनी बिहारच्या विधानसभा निवडणुकीसंदर्भात मोठं भाकीत केलं. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या जनादेशाने विजयी होईल. एनडीएला विक्रमी बहुमत मिळेल आणि राज्यात पुन्हा आमचीच सत्ता असेल. बिहारची निवडणूक नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालीच लढवली जाईल.

# तहव्वूर राणाला १८ दिवसांची न्यायालयीन कोठडी





नवी दिल्ली : २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी दहशतवादी तहव्वूर राणा याचे गुरुवारी अमेरिकेकडून भारताकडे प्रत्यार्पण करण्यात आले आहे. तहव्वूर राणाला एका विशेष विमानाने दिल्लीच्या पालम विमानतळावर आणण्यात आले त्यानंतर एनआयएने त्याला औपचारिकपणे अटक केली. गुरुवारी रात्री तहव्वूर राणाला दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी एनआयएच्या विशेष न्यायालयाकडे एनआयएने २० दिवसांची कोठडी मागितली होती. परंतु, न्यायालयाने एनआयएला राणाची १८ दिवसांची कोठडी दिली.

तत्पूर्वी, विमान भारतात उतरल्यानंतर, तहव्वूर राणा याला कडक सुरक्षेत विमानतळावरून पटियाला हाऊस कोर्टात आणण्यात आले. त्याला विशेष एनआयए न्यायाधीश चंद्रजीत सिंह यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी तहव्वूर राणाची, कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे वकील पीयूष सचदेवा यांनी बाजू मांडली.

एनआयएच्या विशेष न्यायालयात एनआयएचे प्रतिनिधित्व ज्येष्ठ वकील दयान कृष्णन आणि विशेष सरकारी वकील नरेंद्र मान यांनी केले. त्याच वेळी, दिल्ली कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे वकील पीयूष सचदेवा यांनी तहव्वूर राणाची बाजू न्यायालयात मांडली. न्यायाधीशांना संपूर्ण प्रकरणाची आणि वैद्यकीय अहवालाची माहितीही देण्यात आली. ताब्यात घेतल्यानंतर, तहव्वूर राणाची आता एनआयए मुख्यालयात चौकशी केली जाणार आहे.

तहव्वूर हुसेन राणा हा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक आहे. राणा २६ नोव्हेंबर २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील मुख्य सूत्रधारांपैकी एक असलेल्या डेव्हिड कोलमन हेडलीच्या जवळचा आहे. तहव्वूर राणाने यापूर्वी सुमारे १० वर्षे पाकिस्तानी सैन्यात डॉक्टर म्हणून काम केले आहे. यानंतर, त्याने नोकरी सोडली आणि भारताविरुद्ध दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी झाला. तहव्वूर राणाने पाकिस्तानी दहशतवाद्यांना मुंबईवर हल्ला करण्यास मदत करण्याबरोबर हल्ल्याच्या संपूर्ण नियोजनात त्याचा सहभाग होता.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | ऊद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# आयपीएलने नाकारलेले २५हून अधिक खेळाडू पाकिस्तान सुपर लीगमध्ये





आयपीएल हंगामाची जादू हळूहळू पसरत असतानाच सख्खे शेजारी पाकिस्तानात पाकिस्तान सुपर लीग अर्थात पीएसएल आजपासून सुरू होत आहे. दरवर्षी ही स्पर्धा फेब्रुवारी-मार्च महिन्यात होते. यंदा मात्र आयपीएल सुरू असतानाच पीएसएलचेही सामने सुरू होणार आहेत. यानिमित्ताने आयपीएल लिलावात नाकारलेले जवळपास तीन डझन खेळाडू पाकिस्तानात दाखल झाले आहेत. न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विल्यमसन गेल्या वर्षीपर्यंत गुजरात टायटन्स संघाचा भाग होता. लिलावात केनला ताफ्यात घेण्यात कोणीही स्वारस्य दाखवलं नाही. यंदाच्या हंगामात केन आयपीएलचं प्रक्षेपण करणाऱ्या कंपनीसाठी तज्ज्ञ म्हणून मुंबईत आला होता. मात्र पाकिस्तान सुपर लीगचा भाग असल्याने केन पाकिस्तानात दाखल झाला आहे. केनप्रमाणे ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज सलामीवीर डेव्हिड वॉर्नरला आयपीएल लिलावात कोणीही बोली लावली नाही. वॉर्नरने मोर्चा बाजूच्या देशाकडे वळवला असून, तो पीएसएलमध्ये कराची किंग्ज संघाचं नेतृत्व करत आहे.

आयपीएल सुरू झालं तेव्हा पाकिस्तानचा संघ न्यूझीलंडच्या दौऱ्यावर होता. न्यूझीलंडच्या प्रमुख खेळाडूंनी आयपीएलला प्राधान्य दिल्याने त्यांचा ब संघ खेळत होता. न्यूझीलंडच्या या संघानेही पाकिस्तानला वनडे आणि टी२० मालिकेत हरवलं. या संघातील बहुतांश खेळाडूंसाठी आयपीएल लिलावात बोली लागली नव्हती. हे सगळे आता पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळताना दिसणार आहेत. न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू डॅरेल मिचेलला चेन्नई सुपर किंग्सने तब्बल १४ कोटींची बोली लावून संघात घेतलं होतं. मात्र मोठ्या लिलावापूर्वी चेन्नईने त्याला रिटेन केलं नाही. लिलावात त्याला संघात घेण्यासाठी कोणी स्वारस्य दाखवलं नाही. मिचेल आता पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळताना दिसेल. मिचेलसह न्यूझीलंडचा हंगामी कर्णधार मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, टीम सैफर्ट, फिन ॲलन, कायले जेमिसन हे सगळे पाकिस्तान सुपर लीगमधल्या विविध संघांसाठी खेळताना दिसणार आहेत.

मिस्टर प्रेसिडेंट म्हणून ओळखला जाणारा अफगाणिस्तानचा अनुभवी मोहम्मद नबी गेल्या हंगामात मुंबई इंडियन्सचा भाग होता. लिलावापूर्वी मुंबईने त्याला रिटेन केलं नाही. लिलावात त्याच्यासाठी बोली लागली नाही. नबी आता पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेत खेळताना दिसेल. वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार जेसन होल्डर तसंच वनडे आणि टी२०चा नवा कर्णधार शे होप दोघेही पाकिस्तान सुपर लीगचा भाग आहेत.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021